www.a2zSubjects.com

**Signature and Name of Invigilator**

1. (Signature) ______________________

   (Name) ______________________

2. (Signature) ______________________

   (Name) ______________________

**OMR Sheet No. :** ...............................................
(To be filled by the Candidate)

**Roll No.** | | | | | | | | |
(In figures as per admission card)

**Roll No.** ______________________
(In words)

**D 3 8 1 5**

# PAPER - III
# MARATHI

**Time : 2½ hours]** **[Maximum Marks : 150**

Number of Pages in this Booklet : **16**

Number of Questions in this Booklet : **75**

## Instructions for the Candidates

1. Write your roll number in the space provided on the top of this page.
2. This paper consists of seventy five multiple-choice type of questions.
3. At the commencement of examination, the question booklet will be given to you. In the first 5 minutes, you are requested to open the booklet and compulsorily examine it as below :
   (i) To have access to the Question Booklet, tear off the paper seal on the edge of this cover page. Do not accept a booklet without sticker-seal and do not accept an open booklet.
   (ii) **Tally the number of pages and number of questions in the booklet with the information printed on the cover page. Faulty booklets due to pages/questions missing or duplicate or not in serial order or any other discrepancy should be got replaced immediately by a correct booklet from the invigilator within the period of 5 minutes. Afterwards, neither the Question Booklet will be replaced nor any extra time will be given.**
   (iii) After this verification is over, the Test Booklet Number should be entered on the OMR Sheet and the OMR Sheet Number should be entered on this Test Booklet.
4. Each item has four alternative responses marked (1), (2), (3) and (4). You have to darken the circle as indicated below on the correct response against each item.
   **Example :** ① ② ● ④ where (3) is the correct response.
5. Your responses to the items are to be indicated in the **OMR Sheet given inside the Booklet only.** If you mark your response at any place other than in the circle in the OMR Sheet, it will not be evaluated.
6. Read instructions given inside carefully.
7. Rough Work is to be done in the end of this booklet.
8. If you write your Name, Roll Number, Phone Number or put any mark on any part of the OMR Sheet, except for the space allotted for the relevant entries, which may disclose your identity, or use abusive language or employ any other unfair means, such as change of response by scratching or using white fluid, you will render yourself liable to disqualification.
9. You have to return the original OMR Sheet to the invigilators at the end of the examination compulsorily and must not carry it with you outside the Examination Hall. You are however, allowed to carry original question booklet and duplicate copy of OMR Sheet on conclusion of examination.
10. **Use only Blue/Black Ball point pen.**
11. **Use of any calculator or log table etc., is prohibited.**
12. **There are no negative marks for incorrect answers.**

## परीक्षार्थियों के लिए निर्देश

1. इस पृष्ठ के ऊपर नियत स्थान पर अपना रोल नम्बर लिखिए।
2. इस प्रश्न-पत्र में पचहत्तर बहुविकल्पीय प्रश्न हैं।
3. परीक्षा प्रारम्भ होने पर, प्रश्न-पुस्तिका आपको दे दी जायेगी। पहले पाँच मिनट आपको प्रश्न-पुस्तिका खोलने तथा उसकी निम्नलिखित जाँच के लिए दिये जायेंगे, जिसकी जाँच आपको अवश्य करनी है :
   (i) प्रश्न-पुस्तिका खोलने के लिए पुस्तिका पर लगी कागज की सील को फाड़ लें। खुली हुई या बिना स्टीकर-सील की पुस्तिका स्वीकार न करें।
   (ii) **कवर पृष्ठ पर छपे निर्देशानुसार प्रश्न-पुस्तिका के पृष्ठ तथा प्रश्नों की संख्या को अच्छी तरह चैक कर लें कि ये पूरे हैं। दोषपूर्ण पुस्तिका जिनमें पृष्ठ/प्रश्न कम हों या दुबारा आ गये हों या सीरियल में न हों अर्थात किसी भी प्रकार की त्रुटिपूर्ण पुस्तिका स्वीकार न करें तथा उसी समय उसे लौटाकर उसके स्थान पर दूसरी सही प्रश्न-पुस्तिका ले लें। इसके लिए आपको पाँच मिनट दिये जायेंगे। उसके बाद न तो आपकी प्रश्न-पुस्तिका वापस ली जायेगी और न ही आपको अतिरिक्त समय दिया जायेगा।**
   (iii) इस जाँच के बाद प्रश्न-पुस्तिका का नंबर OMR पत्रक पर अंकित करें और OMR पत्रक का नंबर इस प्रश्न-पुस्तिका पर अंकित कर दें।
4. प्रत्येक प्रश्न के लिए चार उत्तर विकल्प (1), (2), (3) तथा (4) दिये गये हैं। आपको सही उत्तर के वृत्त को पेन से भरकर काला करना है जैसा कि नीचे दिखाया गया है।
   **उदाहरण :** ① ② ● ④ जबकि (3) सही उत्तर है।
5. प्रश्नों के उत्तर **केवल प्रश्न पुस्तिका के अन्दर दिये गये OMR पत्रक पर ही** अंकित करने हैं। यदि आप OMR पत्रक पर दिये गये वृत्त के अलावा किसी अन्य स्थान पर उत्तर चिन्हांकित करते हैं, तो उसका मूल्यांकन नहीं होगा।
6. अन्दर दिये गये निर्देशों को ध्यानपूर्वक पढ़ें।
7. कच्चा काम (Rough Work) इस पुस्तिका के अन्तिम पृष्ठ पर करें।
8. यदि आप OMR पत्रक पर नियत स्थान के अलावा अपना नाम, रोल नम्बर, फोन नम्बर या कोई भी ऐसा चिह्न जिससे आपकी पहचान हो सके, अंकित करते हैं अथवा अभद्र भाषा का प्रयोग करते हैं, या कोई अन्य अनुचित साधन का प्रयोग करते हैं, जैसे कि अंकित किये गये उत्तर को मिटाना या सफेद स्याही से बदलना तो परीक्षा के लिये अयोग्य घोषित किये जा सकते हैं।
9. आपको परीक्षा समाप्त होने पर मूल OMR पत्रक निरीक्षक महोदय को लौटाना आवश्यक है और परीक्षा समाप्ति के बाद उसे अपने साथ परीक्षा भवन से बाहर न लेकर जायें। हालांकि आप परीक्षा समाप्ति पर मूल प्रश्न-पुस्तिका तथा OMR पत्रक की डुप्लीकेट प्रति अपने साथ ले जा सकते हैं।
10. **केवल नीले/काले बाल प्वाईंट पेन का ही इस्तेमाल करें।**
11. **किसी भी प्रकार का संगणक (कैलकुलेटर) या लाग टेबल आदि का प्रयोग वर्जित है।**
12. **गलत उत्तरों के लिए कोई नकारात्मक अंक नहीं हैं।**



www.a2zSubjects.com

www.a2zSubjects.com

# MARATHI

# मराठी

## PAPER - III

## प्रश्नपत्रिका - III

**Note :** This paper contains **seventy five (75)** objective type questions of **two (2)** marks each. **All** questions are **compulsory**.

**सूचना :** या प्रश्नपत्रिकेत विविध पर्याय असलेले **पंच्याहत्तर 75** प्रश्न आहेत. प्रत्येक प्रश्नास **दोन (2)** गुण आहेत. **सर्व** प्रश्न **आवश्यक** आहेत.

**1.** ''जिये चुलींची खीर खादली तिये चुलींची काय राख खाल ?'' हा उद्‌गार कोणत्या ग्रंथात आहे ?

(1) स्मृतिस्थळ (2) दृष्टान्तपाठ (3) स्थानपोथी (4) हेतुस्थळ

**2.** ''रामदासांच्या जीवनकार्यातील धर्माधिष्ठित राजकारण आणि ऐहिक जीवनाचा सर्वांगीण उत्कर्ष याचे प्रतिबिंब, कोणत्या काव्यात आढळते ?

(1) मनाचे श्लोक (2) जुना दासबोध (3) करुणाष्टक (4) आनंदवनभुवन

**3.** 'सुश्लोक वामनाचा', हा वामनपंडितांविषयीचा सार्थ अभिप्राय कोणी व्यक्त केला ?

(1) रामचंद्र बडवे (2) द.र. आजगावकर (3) द.सी. पंगू (4) वि.रा. करंदीकर

**4.** निरनिराळ्या सहा कालखंडांत लिहून एकत्र केलेली बखर कोणती ?

(1) सभासदाची बखर (2) छत्रपतीचे चरित्र

(3) महिकावतीची बखर (4) राक्षसतागडीची बखर

**5.** पोवाड्यास 'दृश्य आणि श्राव्य प्रकार' असे कोणी म्हटले ?

(1) य.न. केळकर (2) वि.का. राजवाडे (3) गंगाधर मोरजे (4) म.वा. धोंड



www.a2zSubjects.com

www.a2zSubjects.com

6. टोपणनावे आणि कवी यांच्या जोड्या जुळवा :

| | | | |
|---|---|---|---|
| (a) | साधुदास | (i) | काशीनाथ हरि मोडक |
| (b) | दिवाकर | (ii) | विनायक जनार्दन करंदीकर |
| (c) | माधवानुज | (iii) | शंकर काशीनाथ गर्गे |
| (d) | विनायक | (iv) | विनायक दामोदर सावरकर |
| | | (v) | गोपाळ गोविंद मुजुमदार |

| | **(a)** | **(b)** | **(c)** | **(d)** |
|---|---|---|---|---|
| (1) | (ii) | (i) | (iii) | (v) |
| (2) | (v) | (iii) | (i) | (ii) |
| (3) | (iv) | (ii) | (v) | (i) |
| (4) | (i) | (iii) | (iv) | (v) |

7. स्त्रीलिखित पहिले दलित नाट्यलेखन हा मान कोणत्या नाटकाचा आहे ?

(1) सूर्यास्त (2) झाडाझडती (3) कैफियत (4) पोतराज

8. लक्ष्मणराव सरदेसाई यांच्या एकमेव स्वतंत्र मराठी कादंबरीचे शीर्षक कोणते ?

(1) मांडवी, तू पेटलीस (2) मृगजळ
(3) सीमोल्लंघन (4) मांडवी ! तू आटलीस

9. आरंभीचे दलित कथाकार बंधुमाधव यांची 'जावे त्याच्या वंशा' ही पहिली कथा कोणत्या नियतकालिकाने प्रसिद्ध केली ?

(1) प्रबुद्ध भारत (2) अस्मितादर्श (3) जनता (4) जागृती

10. 'इतस्ततः' हा ललितलेखसंग्रह कोणाचा आहे ?

(1) शांता शेळके (2) विजया राजाध्यक्ष (3) शरदिनी डहाणूकर (4) सुनीता देशपांडे

11. भाषेच्या एककालिक वर्णनासाठी कालक्रमिक अभ्यासाची काही गरज नाही, उलट कालक्रमिक अभ्यास मात्र एककालिक वर्णनांवर अवलंबून असतो.

(1) पूर्वार्ध बरोबर, उत्तरार्ध चूक (2) पूर्वार्ध चूक, उत्तरार्ध बरोबर
(3) संपूर्ण विधान बरोबर (4) संपूर्ण विधान चूक



www.a2zSubjects.com

www.a2zSubjects.com

**12.** चॉम्स्कीच्या मते भाषाविज्ञानाचे प्रमुख वैशिष्ट्य कोणते ?

(1) रचनांतरणाचे नियम
(2) निजभाषिकांच्या भाषिक क्षमतेचा शोध
(3) वाचिक वर्तन
(4) चिन्हक आणि चिन्हित यांतील परस्पर संबंध

**13.** होर्न्ले यांनी प्रतिपादन केलेले 'द्विरागमन सिद्धांत' व 'पाचर सिद्धांत' कोणी नाकारले ?

(1) आर.ए. हॉल (2) एल.आर. पामर (3) एफ.सी. साउथवर्थ (4) जॉर्ज ग्रियर्सन

**14.** शब्द आणि आदानप्रक्रिया यांच्या जोड्या लावा :

| | | | |
|---|---|---|---|
| (a) | कॅसेट, क्रिकेट | (i) | रूपांतरादान |
| (b) | सुनीत, जबाबदार | (ii) | शब्दादान |
| (c) | दूरध्वनी, मधुचंद्र | (iii) | भाषांतरादान |
| (d) | मोटारगाडी, टाइमशीर | (iv) | संमिश्रादान |
| | | (v) | व्याकरणादान |

| | **(a)** | **(b)** | **(c)** | **(d)** |
|---|---|---|---|---|
| (1) | (ii) | (i) | (iii) | (iv) |
| (2) | (v) | (iv) | (iii) | (ii) |
| (3) | (i) | (iii) | (iv) | (v) |
| (4) | (iv) | (ii) | (i) | (iii) |

**15.** काल आणि गाल या दोन शब्दांच्या जोडीला स्वनिमाच्या संदर्भात काय म्हणतात ?

(1) वैकल्पिक विनियोग
(2) लघुतमांतर युग्म
(3) स्वनान्तर
(4) खंडाधिष्ठित स्वनिम

**16.** मोहन आज शाळेत गेला, मोहन आज शाळेत गेला, मोहन आज शाळेत गेला, मोहन आज शाळेत गेला या चार वाक्यांतील अधोरेखित शब्दांद्वारे व्यक्त होणारा अर्थभेद कशामुळे झाला आहे ?

(1) सुरावली (2) नासिक्य (3) बलाघात (4) स्वनान्तर

**17.** 'तो तुला कान देईल', 'आणखी एक पोळी मला व्हावी', 'रे माझ्या लाडक्या मुला', 'माझे चांगले ताई' ही वाक्ये वा वाक्यांश कोणत्या भाषेच्या परिणामातून साधली गेली आहेत ?

(1) पोर्तुगीज (2) संस्कृत (3) इंग्रजी (4) फार्सी



www.a2zSubjects.com

www.a2zSubjects.com

**18.** 'ळ' बद्दल 'य' येणे (केळ > केय), 'ण' ऐवजी 'न' चा वापर (पण > पन), 'वि' चा 'इ' उच्चार (विचार > इचार) हे विशेष कोणत्या बोलीतील आहेत ?

(1) वऱ्हाडी (2) नागपुरी (3) हळबी (4) अहिराणी

**19.** 'जरा पेपरातून डोकं काढायला मिळेल तर ऐकू येईल'. या वाक्यातून सूचित होणाऱ्या अर्थाचा प्रकार कोणता ?

(1) भावपर अर्थ (2) साहचर्यपर अर्थ (3) सहज/उद्भुत अर्थ (4) शैलीगत अर्थ

**20.** मेस्त्री, पेरू, फालतू, लिलाव हे शब्द मूळ कोणत्या भाषेतील आहेत ?

(1) अरबी (2) फार्सी (3) पोर्तुगीज (4) तेलुगू

**21.** दंडीने आख्यायिका या गद्यप्रकाराचे विस्तृत वर्णन केले असून भामहाने मात्र आख्यायिका हा स्वतंत्र प्रकार मानण्याचे कारण नाही, असे मत दिले आहे.

(1) संपूर्ण विधान चूक (2) संपूर्ण विधान बरोबर

(3) पूर्वार्ध चूक, उत्तरार्ध बरोबर (4) पूर्वार्ध बरोबर, उत्तरार्ध चूक

**22.** 'वक्रोक्तिश्च रसोक्तिश्च स्वभावोक्तिश्च वाङ्मयम्' ही व्याख्या कोणाची ?

(1) अभिनवगुप्त (2) माणिक्यचंद्र (3) भोज (4) भामह

**23.** भारती, कौशिकी, सात्त्वती, आरभटी या भरताच्या चार वृत्ती न स्वीकारता न्यायवृत्ती, अन्यायवृत्ती, फलसंवित्तिवृत्ती या तीन भिन्न वृत्तींचा पुरस्कार करणारा काश्मिरी पंडित कोण आहे ?

(1) वामन (2) उद्भट (3) अभिनवगुप्त (4) आनंदवर्धन

**24.** 'हा तरुण मनुष्य वाघ आहे'. यामध्ये प्रकट झालेला अर्थ कोणता आहे ?

(1) शुद्धा उपादान (2) शुद्धा साध्यवसाना (3) गौणी साध्यवसाना (4) गौणी सारोपा

**25.** नाट्याचा मुळीच विचार न करता रसांचे परिपूर्ण विवेचन करताना रस आणि भाव केवळ नाट्यापुरतेच मर्यादित नसून सर्व प्रकारच्या काव्यांत त्यांचा परिपोष होतो अशी विचारसरणी स्पष्टपणे प्रथम कोणी मांडली ?

(1) रुद्रट (2) भामह (3) दंडी (4) कुंतक



www.a2zSubjects.com

www.a2zSubjects.com

**26.** साहित्य शेवटी भाषेत फुलते हा विचार गेल्या काही दशकांत प्रभावी झाला आहे. या दृष्टीने भारतीय साहित्यशास्त्र आधुनिक साहित्य चर्चेला जवळचे वाटेल आणि मार्गदर्शक ठरेल. हा अभिप्राय कोणाचा ?

(1) द.भि. कुलकर्णी (2) ग.त्र्यं. देशपांडे (3) गो.म. कुलकर्णी (4) के.रं. शिरवाडकर

**27.** कवितांमध्ये पुढे ठेवलेले प्रमुख उद्दिष्ट हे की सामान्य जीवनातून प्रसंग आणि परिस्थिती यांची निवड करणे आणि शक्य तो लोक खरोखर वापरतात अशा निवडक भाषेतून त्यांचे वर्णन करणे आणि त्यामध्ये कल्पनाशक्तीने असे रंग भरणे की ज्यामुळे सामान्य गोष्टी (वाचक) मनाला असामान्य स्वरूपात सादर केल्या जातील. ही साहित्यविषयक भूमिका कोणी मांडली ?

(1) एस.टी. कोलरिज (2) विलियम वर्डस्वर्थ (3) एझ्रा पाउंड (4) टी.एस. इलियट

**28.** साहित्यकृतींवर वस्तुनिष्ठपणे भाष्य करणे, त्यांचे विश्लेषण व तुलना करणे, त्यांचा अर्थ लावणे व अभिरुचीला वळण लावणे, हे समीक्षेचे खरे कार्य होय ही भूमिका कोणी मांडली आहे ?

(1) वा.ल. कुलकर्णी (2) रा.भा. पाटणकर (3) शरच्चंद्र मुक्तिबोध (4) मिलिंद मालशे

**29.** मराठी समीक्षेत 'आस्वादक समीक्षेची कैफियत' कोणी मांडली ?

(1) गंगाधर गाडगीळ (2) गंगाधर पाटील (3) म.द. हातकणंगलेकर (4) म.सु. पाटील

**30.** 'ख-र-व-ड' या प्रकारची शैलीमीमांसा समीक्षेला पायाभूत ठरू शकेल का ? असा प्रश्न कोणत्या ग्रंथात उपस्थित केला आहे ?

(1) टीकाविवेक (2) शैलीवैज्ञानिक समीक्षा

(3) साहित्यवेध (4) आधुनिक समीक्षा-सिद्धांत

**31.** भावकाव्यात कवीचा पहिला स्वर असतो तेथे कवी स्वत:शी बोलत असतो किंवा कुणाशीच बोलत नसतो, तर त्याचा कथाकाव्यात दुसरा स्वर असतो जेथे तो वाचक, श्रोते वा प्रेक्षक यांच्यांशी बोलत असतो आणि नाट्यकाव्यात कवीचा तिसरा स्वर असतो ज्याद्वारे कवी आपण निर्माण केलेल्या काल्पनिक पात्रांद्वारे बोलत असतो; अशा प्रकारे कवीचे स्वर तीन असतात, असे प्रतिपादन कोणी केले ?

(1) सॅम्युएल टेलर कोलरिज (2) टी.एस. एलियट

(3) विलियम वर्डस्वर्थ (4) डब्ल्यू.बी. एटस्



www.a2zSubjects.com

www.a2zSubjects.com

**32.** वाङ्मयीन आत्मनिष्ठेचे व तादात्म्याचे विवेचन करताना आत्मिक अनुभव, त्याच्या बारीकसारीक अर्थच्छटांसह व अंगभूत सुसंगतीसह शब्दबद्ध करणे म्हणजे कविता लिहिणे अशी त्यांनी काव्यलेखनविषयक कल्पना गृहीत धरली आहे, असे सुधीर रसाळांनी कोणाविषयी म्हटले आहे ?

(1) पुरुषोत्तम शिवराम रेगे (2) बाळ सीताराम मर्ढेकर

(3) शरच्चन्द्र मुक्तिबोध (4) माधव आचवल

**33.** संकल्पना व संकल्पनाकार यांच्या जोड्या जुळवा :

| | | | |
|---|---|---|---|
| (a) | नॉम चॉम्स्की | (i) | भाषिक ज्ञानक्षमता |
| (b) | जोनाथन कलर | (ii) | साहित्यिक ज्ञानक्षमता |
| (c) | ग्रॅहम सँडर्स | (iii) | काव्यात्मक ज्ञानक्षमता |
| (d) | रेने देकार्त | (iv) | स्वत्वक्षमता |
| | | (v) | संहितासर्जकक्षमता |

| | **(a)** | **(b)** | **(c)** | **(d)** |
|---|---|---|---|---|
| (1) | (i) | (ii) | (iii) | (iv) |
| (2) | (i) | (iii) | (ii) | (v) |
| (3) | (i) | (iv) | (iii) | (v) |
| (4) | (iv) | (ii) | (iii) | (v) |

**34.** मानसशास्त्रीय समीक्षादृष्टिनुसार स्वप्नसूत्रास धरुन साहित्यकृतीत लेखकाच्या व्यक्तिगत इच्छा, हेतू, व्यक्तित्व यांचा आविष्कार होत नसल्यामुळे साहित्यकृतीत अबोध मन:स्तर, असंज्ञ अर्थबंध (पॅटर्नस् ऑव्ह अनकॉन्शस मीनिंग) संघटित आणि साकार झालेले असतात, म्हणून तिचा अर्थ लावताना लेखकाचा इतिहास, त्याची चरित्रपर माहिती विचारात घेऊ नये.

(1) संपूर्ण विधान चूक (2) संपूर्ण विधान बरोबर

(3) पूर्वार्ध चूक, उत्तरार्ध बरोबर (4) पूर्वार्ध बरोबर, उत्तरार्ध चूक

**35.** महाराष्ट्रात दत्तसंप्रदायाचा पाया भरला जाण्यामागे श्रीपाद श्रीवल्लभ आणि नृसिंहसरस्वती या दोन विभूतींचे कार्य कारणीभूत आहे, हे खरे असले तरी त्या संप्रदायाचा प्रसार करण्याचे श्रेय संत एकनाथांस द्यावयास हवे.

(1) संपूर्ण विधान चूक (2) संपूर्ण विधान बरोबर

(3) पूर्वार्ध चूक, उत्तरार्ध बरोबर (4) पूर्वार्ध बरोबर, उत्तरार्ध चूक



www.a2zSubjects.com

www.a2zSubjects.com

**36.** मेजर थॉमस कॅण्डीने मराठी भाषेच्या गद्यशैलीकडे लक्ष पुरवण्यापूर्वी मराठी भाषेत सामान्यत: पुढील लेखनाच्या वळणात कोणते वळण नव्हते ?

(1) गृहस्थीवळण या नावाने प्रसिद्ध पावलेले जुने पेशवाई वळण

(2) शास्त्रीवळण किंवा संस्कृती वळण

(3) इंग्रजी किंवा नवे भाषान्तरी वळण

(4) संयुक्त वळण

**37.** पुढील विधान पूर्ण करा :

''दक्षिणा प्रैझ कमिटीचे प्रारंभीचे धोरण'' __________ असे होते.

(1) 1848 पासून दक्षिणी भाषेत पुस्तके प्रसिद्ध करणे

(2) 1851 पासून भाषांतरित ग्रंथांना उत्तेजन देणे

(3) ब्रिटिशपूर्व संस्कृती व ब्रिटिशसंस्कृती यांच्या संघर्षाचे तरुण हिन्दू मनावर होणारे संस्करण योग्य प्रकारे चित्रित करणे

(4) भाषान्तरापेक्षा स्वतंत्र ग्रंथांना उत्तेजन देणे

**38.** ''पूर्वी आमच्या लोकांस मराठी भाषा शिकणें हें थट्टेसारखे वाटत होते; परंतु हल्लीं ती भाषा शिकून तींत ग्रंथ लिहिणें हें साधारण कृत्य आहे असें नाहीं, अशी बहुतेकांची खात्री झाली आहे, तरी आमच्या लोकांस स्वभाषेंतील पुस्तकें व वर्तमानपत्रे वाचण्याची जितकी गोडी लागावी, तितकी अद्यापि लागली नाहीं, असें वाटतें. तर लोकांस स्वभाषेंतील पुस्तकें वगैरे वाचण्याची गोडी लागावी, या हेतूने यथामति हा ग्रंथ केला आहे'', असा हेतू कोणी व्यक्त केला आहे ?

(1) 'मोचनगड' कार रामचन्द्र भिकाजी गुंजीकर

(2) 'घाशीराम कोतवाल' कार मोरोबा कान्होबा विजयकर

(3) 'मुक्तामाला' कार लक्ष्मणशास्त्री मोरेश्वर हळबे

(4) 'मंजुघोषा' कार नारो सदाशिव रिसबूड

**39.** ''आज समाजजीवन व राष्ट्रजीवन प्रगत होणारे साहित्यशास्त्र निर्माण होत नाही'', अशी खंत कोणी व्यक्त केली ?

(1) श्रीधर व्यंकटेश केतकर

(2) वामन मल्हार जोशी

(3) डॉ. बाबासाहेब आंबेडकर

(4) ज.स. करंदीकर



www.a2zSubjects.com

www.a2zSubjects.com

**40.** 1935 ते 1945 या काळात प्रौढ कुमारिकांच्या विवाहासंबंधी मानसिक कुचंबणांना वाचा फोडणारे विभावरी शिरुरकर यांच्या लेखनाला कोणते संबोधन लाभले ?

(1) नवमतवादी (2) मानवतावादी (3) स्त्रीवादी (4) आधुनिकवादी

**41.** स्त्रियांची देवता म्हणून स्थापना व्हावयास नको आहे. त्यांची मानुषी म्हणून स्थापना व्हावयास पाहिजे. असे विचार कोणी मांडले ?

(1) बाळूताई खरे, का.न. केळकर
(2) धोंडो केशव कर्वे
(3) श्रीधर व्यंकटेश केतकर
(4) वामन मल्हार जोशी

**42.** 'गाईचे दुधावर हिंदुस्थानातील लोकांचा निर्वाह फार आहे. बाळ, तरुण, वृद्ध, दांडगे, नेमधर्मी, रोगी, पहिलवान इत्यादी सर्वांसच दुधाचा उपयोग आहे. शेतभात करणारे लोकांचा मुख्य आधार काय तो बैल व लमाण वगैरे लोकांस ओझी नेण्यासही बैलच आहेत'. असा विचार कोणी मांडला ?

(1) रा.गो. भांडारकर (2) दादोबा पांडुरंग (3) गो.ग. आगरकर (4) लोकहितवादी

**43.** 1935 साली बडोदा येथे झालेल्या मराठी साहित्य संमेलनात 'तत्त्वज्ञान व समाजशास्त्र' या शाखासंमेलनाचे अध्यक्षपद कोणी भुषविले ?

(1) महर्षी वि.रा. शिंदे
(2) सयाजीराव गायकवाड
(3) राजारामशास्त्री भागवत
(4) रा.गो. भांडारकर

**44.** 'जातिभेदापासून कितीही तोटे असोत, त्यामुळे एक फायदा खचित होतो तो हा की, त्या योगाने प्रस्थापित आचार व्यवस्थितपणे चालून समाजास एक प्रकारे स्थैर्य येते' हे कोणत्या समाजसुधारकाने सांगितले ?

(1) लोकमान्य टिळक (2) बाबा पदमनजी (3) गो.ग. आगरकर (4) वि.दा. सावरकर

**45.** बाळशास्त्री जांभेकर यांना नियतकालिक चालविण्यास साह्य करणारी व्यक्ती कोण ?

(1) रघुनाथ हरिश्चंद्रजी
(2) बापू छत्रे
(3) कृष्णाजी त्रिंबक रानडे
(4) पांडुरंग बापू पावसकर



www.a2zSubjects.com

www.a2zSubjects.com

46. दलित चळवळीचा पुरस्कार करणारी मासिके आणि संपादक यांच्या जोड्या जुळवा :

| | | | |
|---|---|---|---|
| (a) | मोहर | (i) | रमेशचंद्र कांबळे |
| (b) | आम्ही | (ii) | वा.ला. पंडित |
| (c) | धम्मदीप | (iii) | शिवा इंगोले |
| (d) | सिद्धार्थवाणी | (iv) | बाबूराव बागूल |
| | | (v) | म.दा. नलावडे |

| | **(a)** | **(b)** | **(c)** | **(d)** |
|---|---|---|---|---|
| (1) | (iii) | (v) | (iv) | (ii) |
| (2) | (i) | (iii) | (v) | (iv) |
| (3) | (v) | (iv) | (ii) | (i) |
| (4) | (v) | (ii) | (i) | (iii) |

47. राजा ढाले आणि सतीश काळसेकर या दोघांनी मिळून कोणत्या अनियतकालिकाचे संपादन केले ?

(1) शब्द (2) रहस्यरंजन (3) ऐसाजे (4) चक्रवर्ती

48. बाबूराव बागूलांच्या 'सूड' मधून कोणता वैश्विक जाणिवेचा अर्थ ध्वनित होतो ?

(1) समताधिष्ठित स्त्रीवादाचे सुस्पष्ट चित्रण (2) स्त्रीवरील अन्यायाचे प्रत्युत्तर

(3) दलित जीवनाचे चित्रण (4) वेश्या जीवनाचे दर्शन

49. गंगाधर गाडगीळांच्या 'किडलेली माणसे' या कथेतील माणसे कथाशीर्षकाप्रमाणे किडलेली का जाणवतात ?

(1) सोयीसुविधा व पैशांची उणीव असल्यामुळे

(2) सामूहिक मानसशास्त्राच्या अभिव्यक्तीसाठी

(3) सभ्यपणाचा बुरखा पांघरलेल्या व्यक्तींचा स्वार्थ प्रकट होत असल्यामुळे

(4) कथाविषय झालेल्या व्यक्ती मध्यमवर्गीय असल्यामुळे

50. अरसिक किती हा मेला
कविता फाडूनि बाहेर गेला

स्मृति चित्रातील या पंक्ती कुणाच्या संदर्भातील आहेत ?

(1) ना.वा. टिळक (2) बालकवी (3) देवदत्त टिळक (4) भास्करराव उजगरे



www.a2zSubjects.com

www.a2zSubjects.com

51. 'द स्टडी ऑफ फोकलोअर' हा ग्रंथ कोणाचा आहे ?

(1) विल्यम बॅस्कम (2) फ्रान्सिस उटले (3) ॲलन डंडेस (4) विल्हेम ग्रिम

52. भारत इतिहास संशोधन मंडळाच्या इतिवृत्तात 'आदित्य राणुबाई' च्या कथेचे विवेचन कोणी केले आहे ?

(1) श्रीधर व्यंकटेश केतकर (2) विश्वनाथ काशीनाथ राजवाडे
(3) राजारामशास्त्री भागवत (4) न.शें. पोहनेरकर

53. लोकगीतांच्या निर्मितीसंदर्भात 'व्यक्तिवादी' सिद्धांत कोणी मांडला ?

(1) जेकब ग्रिम (2) स्टाइनथॉल (3) बिशप पर्सी (4) ए.डब्ल्यू. श्लेगेल

54. तमाशातील 'वगा' च्या आरंभी पद्यस्वरूपाची जी रचना सादर केली जाते, तिला कोणती संज्ञा वापरली जाते ?

(1) गण (2) आख्यान (3) हाळीची लावणी (4) शिलकार

55. 'लोकनाट्याची परंपरा' हा ग्रंथ कोणाचा ?

(1) नामदेव व्हटकर (2) वि.कृ. जोशी
(3) म.ना. सहस्त्रबुद्धे (4) गंगाधर मोरजे

56. तौलनिक साहित्याभ्यासाला प्रथम अधिकृत मान्यता कोठे मिळाली ?

(1) जर्मनीतील हायडेलबर्ग विद्यापीठात (2) अमेरिकेतील हार्वर्ड विद्यापीठात
(3) फ्रान्समधील सॉरबॉन विद्यापीठात (4) भारतातील शांतिनिकेतन विद्यापीठात

57. तौलनिक साहित्याभ्यासात प्रभावमीमांसेला महत्त्वाचे स्थान का आहे ?

(1) परक्यांचे उसने घेण्याच्या स्वाभाविक मानवी वृत्तीमुळे
(2) जित-जेतेसंबंधामुळे
(3) भिन्न-भिन्न साहित्यांत विकास आढळत असल्यामुळे
(4) प्रभावित साहित्यांतर्गत चढउतारांचा शोध घेण्यासाठी



www.a2zSubjects.com

www.a2zSubjects.com

58. एखाद्या साहित्यकृतीने दुसऱ्या साहित्यकृतीला जन्म दिला, ही कल्पना नितान्त त्याज्य आहे, असे कोणी म्हटले ?

(1) आय.ए. रिचर्डस (2) ऑस्कर कॅम्पबेल (3) एस.एस. प्रावर (4) रेने वेलेक

59. राष्ट्रीय साहित्य असे कशाला म्हणतात ?

(1) एका देशातील साहित्यपरंपरांना

(2) समान भाषिक व वाङ्मयीन परंपरांच्या लोकसमुदायातील प्रत्येक घटकाच्या साहित्याला

(3) वेगवेगळ्या भाषांतील साहित्याला

(4) बहुभाषिक साहित्यपरंपरांतील एकाच विषयासंबंधीच्या साहित्याला

60. 'अमलदार' हे कोणाच्या नाटकाचे भाषांतर आहे ?

(1) मोलिएर (2) फिट्सजेरल्ड (3) जॉर्ज बर्नार्ड शॉ (4) गोगोल

61. स्त्रीवादाची भूमिका कोणती ?

(1) पुरुषसत्तेचे निर्मूलन (2) स्त्रियांच्या शोषणाचे पुनर्वाचन

(3) स्त्री-पुरुषसंबंधाचे वास्तव चित्रण (4) स्त्रियांच्या दु:खानुभवाची मीमांसा

62. स्त्रीसमस्यांच्या सोडवणुकीचा स्त्रीवादी मार्ग कोणता ?

(1) स्त्रीशिक्षणाची वाढ (2) नव्या मूल्यांची प्रस्थापना

(3) प्रचलित समाजव्यवस्थेत परिवर्तन (4) प्रस्थापित मूल्यांशी सामोपचाराने तडजोड

63. स्त्रीवादी कवितेचा गाभा कोणता ?

(1) मानवी भावनांचा हळुवार आविष्कार (2) सत्तासंबंधाचे दर्शन

(3) स्त्रियांचे अनुभवविश्व (4) स्त्रियांच्या शोषणाची कैफियत

64. स्त्रीला लेखन करताना येणाऱ्या अडचणींचा परामर्श घेणारा गाजलेला ग्रंथ कोणता ?

(1) द मॅड वुमन इन द ॲटिक

(2) लिटरेचर ॲज हेजिमनी : मार्क्सिस्ट ॲण्ड फेमिनिस्ट लिटररी पर्स्पेक्टिव्ह्ज

(3) ऑफ वुमन बॉर्न : मदरहूड ॲज एक्स्पिरिअन्स ॲण्ड इन्स्टिट्यूशन

(4) अ रूम ऑफ वन्स ओन



www.a2zSubjects.com

www.a2zSubjects.com

**65.** 'बचनागाच्या बेटातून वहात आल्यामुळे

नदीचे पाणी विषमय बनते

तसे अवघे मनच कडवट होऊन जाते'

– या काव्यपंक्ती कोणाच्या ?

(1) नीरजा (2) रजनी परुळेकर (3) प्रभा गणोरकर (4) हिरा बनसोडे

**66.** अशोक व्हटकर यांच्या 'मेलेलं पाणी' या कादंबरीतील केंद्रवर्ती आशय कोणता ?

(1) रेल्वे रुळाखाली गेलेल्या जमिनीमुळे उध्वस्त झालेले कुटुंब

(2) ढोर समाजाच्या वेदनेचे चित्रण

(3) कोरडवाहू शेतीची समस्या

(4) स्वत:ची शेती असून दुसरीकडे मजूरी करावी लागणे

**67.** तळागाळातील माणसे, हमाल, व्यापारी, अडते, दलाल, शेतकरी व तंबाखूच्या धंद्यातील स्त्रिया यांचे वर्णन पुढीलपैकी कोणत्या कथेत आढळते ?

(1) शिवणावळ (2) वाणगी (3) ऊन (4) तुझी कथा माझे शब्द

**68.** पुढीलपैकी जानपदगीते किंवा ग्रामीणगीते लिहिणारा कवी कोण ?

(1) यशवंत (2) माधव ज्युलियन (3) प्र.के. अत्रे (4) सोपानदेव चौधरी

**69.** जोड्या जुळवा : कथा व कथाकार

| | | | |
|---|---|---|---|
| (a) | सहकारी | (i) | मोहन पाटील |
| (b) | उचल | (ii) | वामन होवाळ |
| (c) | नवी बॉडी | (iii) | दत्ता भगत |
| (d) | वाटा आडवाटा | (iv) | श्रीराम गुंदेकर |
| | | (v) | गणेश घाडगे |

| | **(a)** | **(b)** | **(c)** | **(d)** |
|---|---|---|---|---|
| (1) | (i) | (ii) | (iii) | (iv) |
| (2) | (v) | (iv) | (i) | (ii) |
| (3) | (iv) | (v) | (ii) | (i) |
| (4) | (ii) | (iii) | (iv) | (v) |



www.a2zSubjects.com

www.a2zSubjects.com

**70.** मी माझ्या मुलखात नांदतो ऐश्वर्याचा राजा इथल्या मातीमध्ये रुजविल्या चैतन्याच्या बागा या काव्यपंक्ती कोणत्या कवितासंग्रहातील आहेत ?

(1) अजिंठा (2) वही (3) प्रार्थना दयाघना (4) पावसाळा

**71.** ''दलित'' ही संज्ञा जातीयवादी नसून या देशातील समाजव्यवस्थेने आणि जीर्ण संस्कृतीने नाकारलेल्या, अस्पृश्य मानल्या गेलेल्या, बहिष्कृत, उपेक्षित, सर्व वंचित समाजाशी आणि त्यांच्या साहित्य निर्मितीशी संवादी आहे' हे मत कोणाचे ?

(1) रा.ग. जाधव (2) राजा ढाले (3) ज.वि. पवार (4) नामदेव ढसाळ

**72.**

एकोणीसशे बेचाळीस साली

ब्रिटिशांना 'चलेजाव' म्हणालात तुम्ही

स्वातंत्र्याच्या पन्नास वर्षांनंतर

तुम्हाला काय म्हणावे आम्ही

– या काव्यपंक्ती कोणाच्या आहेत ?

(1) वामन निंबाळकर (2) नामदेव ढसाळ (3) ज.वि. पवार (4) त्र्यंबक सपकाळे

**73.** 'चोखामेळा' हे वृत्तपत्र 1931 मध्ये कोणी सुरू केले ?

(1) आनंदराव टेकाडे (2) कालिचरण नंदागवळी

(3) किसन फागू बनसोडे (4) गोपाळबाबा वलंगकर



www.a2zSubjects.com

www.a2zSubjects.com

**74.** जोड्या जुळवा : ग्रंथ व ग्रंथकार

| | | | |
|---|---|---|---|
| (a) | लोकपत्रकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर | (i) | दिनकर हेरलेकर |
| (b) | डॉ. आंबेडकरांचे विरोधक | (ii) | बाळकृष्ण कवठेकर |
| (c) | दलित साहित्य चिकित्सा | (iii) | रा.ग. जाधव |
| (d) | दलित साहित्य : एक आकलन | (iv) | सदा कऱ्हाडे |
| | | (v) | सुखराम हिवराळे |

| | **(a)** | **(b)** | **(c)** | **(d)** |
|---|---|---|---|---|
| (1) | (iii) | (iv) | (ii) | (v) |
| (2) | (v) | (i) | (iv) | (ii) |
| (3) | (ii) | (iii) | (i) | (iv) |
| (4) | (iv) | (ii) | (iii) | (i) |

**75.** 'पाणी कायबी पचवतं, त्याच्या पोटात सगळ्याचा रस होतो'

वरील वाक्य कोणत्या साहित्यकृतीतील आहे ?

(1) काट्यावरची पोटं (2) उचल्या (3) उपरा (4) तराळ अंतराळ

- o 0 o -



www.a2zSubjects.com

www.a2zSubjects.com

**Space For Rough Work**



www.a2zSubjects.com